# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**सायंकाळ**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ०५.१०.२०२५ रविवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक ०५.१०.२०२५ चे १६०० वा. ते १७.३० वा. दरम्यान गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे पारडी हद्दीत भंडारा नागपूर हायवे, नाका क्र. ५ जवळ, पाल इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ, नागपूर येथे सापळा रचुन, एका हॅप्पी ऑटो व बर्गमॅन गाडीवरील संशयीत ईसमांना थांबवून त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नावे १) मोहम्मद शारीक मोहम्मद वकील असांरी वय ३० वर्ष रा. इंदिरामाता नगर, बिनाकी ले—आउट, यशोधरानगर, नागपूर २) मोहम्मद मासूम शेरअली शेख उमर वय २२ वर्ष रा. वनदेवी चौक, कामगारपूरा, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. त्यांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांचे ताब्यात एकुण १२ किलो गांजा मिळून आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, हॅप्पी ऑटो, बर्गमॅन मोपेड व मोबाईल फोन, तसेच अल्यूमीनीयमच्या प्लेटस, व रॅक असा एकुण ८,४४,९००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे साथिदार पाहिजे आरोपी क्र. ३) लावण्य राणा ४) गोपीनाथ भोक्ता रा. ओरीसा याचे मदतीने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), २(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पारडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव पारडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोनि. गजानन गुल्हाने, सपोनि. संदीप जाधव, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा. पवन गजभिये, विवेक आढाऊ, अरविंद गेडेकर, गणेश जोगेकर, नितीन साळुंखे, राहुल पाटील, शैलेष डोबोले, मनोज नेवारे व सहदेव चिखले यांनी केली.

**२) गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :— अवैध ई—सिगारेट विक्री करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत. त्याच अंतर्गत,

दिनांक ०४.१०.२०२५ चे १३.१० वा. ते १४.३० वा. चे दरम्यान गणेशपेठ पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत एम्प्रेस मॉल रोड, वंदेमातरम गार्डन जवळील फुटपाथवर ऊभ्या असलेल्या ईसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव वसीम शेख मुस्तफा शेख, वय ३७ वर्ष, रा. मोमीनपूरा, जामा मस्जिद जवळ, बशीर गॅरेज समोर, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे जवळील पाढऱ्या रंगाचे पिशवी मध्ये भारत सरकारने प्रतिबंधीत केलेल्या वेगवेगळया कंपनीच्या, वेगवेगळया फ्लेव्हरच्या ई—सिगारेट, ७९ नग, एकुण किंमती अंदाजे १,८०,७३४/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता ग्राहकांना प्रतिबंधीत वेगवेगळया फ्लेव्हरच्या ई—सिगारेटचा साठा करून विक्री करीता बाळगतांना मिळुन आला. आरोपीचे विरूध्द पोलीस ठाणे गणेशपेठ येथे कलम ४, ७ ई—सिगारेट प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे, पोउपनि. मल्हारी डाईफोडे, विजय नाचन, पोअं. प्रतिक ईटनकर, सागर धवन, वैजनाथ अब्दगीर, दलीत लोखंडे, मोहसीन पठान व अतुल यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कोराडी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सुदेश अशोक पाटील वय २६ वर्ष रा. झेंडा चौक, महादुला, कोराडी, नागपूर हे स्वरयू एनर्जी लिमीटेड मुंबई येथे अभियंता असुन त्यांनी दिनांक ०२.१०.२०२५ चे १०.३० वा. ते दिनांक ०३.१०.२०२५ चे १०. ४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत खसाळा म्हसाळा रोड, रेल्वे ट्रक जवळील बोगदया जवळ, पावर प्लान्टला लागणारे साहित्य, सोलरचे चार स्के एन.एम.डी.सी केबल ड्रम ०२ नग प्रती नग २००० मिटर असा एकुण १,४४,०००/— रू. चा मुद्देमाल एका टिनाचे पत्र्यामध्ये ठेवला असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. चौव्हाण ७०३०४९५०४९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**